# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

फोन ०२०-२५६०१२०२

website : www.unipune.ac.in

गणेशखिंड,

पुणे – ४११ ००७

email : coe@pun.unipune.ac.in

संदर्भ : परीक्षा/एस अँन्ड टी/३०६

दिनांक : ०३ मार्च, २०२०

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था
पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा

**विषय : महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या अडचणींचे निवारण महाविद्यालयाच्या स्तरावर करण्याबाबत.**

महोदय/महोदया,

प्रत्येक महाविद्यालय व विद्यापीठ परीक्षा विभाग यांचेमध्ये अधिक सुसूत्रता व समन्वय निर्माण होऊन विद्यार्थ्यांच्या परीक्षा अर्ज भरणे, विषय/नावातील/गुणपत्रकातील दुरुस्ती, इत्यादि अडचणींचे निवारण महाविद्यालय स्तरावर व्हावे व त्यांना विद्यापीठात येण्याची गरज भासू नये यासाठी प्रत्येक महाविद्यालय/संस्था स्तरावर महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी (College Examination Officer) यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. परंतु यासंदर्भात असे निदर्शनास येते की, विद्यार्थ्यांच्या अडचणींचे निवारण महाविद्यालय स्तरावर न होता त्यांना प्राचार्यांचे पत्र देऊन विद्यापीठात पाठविण्यात येते. पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हयातील ग्रामीण भागातील विद्यार्थी दूरवरचा प्रवास करुन विद्यापीठात येत आहेत आणि त्यामुळे त्यांच्या अभ्यासावर परिणाम होऊन त्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

यासंदर्भात आपणांस विनंती करण्यात येते की, विद्यार्थ्यांच्या अडचणींचे निवारण महाविद्यालय स्तरावर करण्याबाबत आपल्या महाविद्यालयात परीक्षा अधिकारी (College Examination Officer) यांना सूचित करावे व काही अडचणी महाविद्यालय स्तरावर सोडविता येण्यासारख्या नसल्यास महाविद्यालयाचे परीक्षा अधिकारी अथवा महाविद्यालयाचे प्रशासकीय सेवक यांना अशा विद्यार्थ्यांचे अर्ज एकत्र घेऊन परीक्षा विभागात येण्याबाबत सूचना द्याव्यात व विद्यापीठास सहकार्य करावे.

कळावे,

आपला,

(महेश काकडे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ